# नियमित दिवाणी दावा क्र.१२२/२०२१ मधील नि.५ खालील आदेश

**CNR: MHST14-001202-2021**

०१. वादी यांनी दाखल केलेला प्रस्तूतचा अर्ज, सोबतचे प्रतिज्ञापत्र, प्रतिवादींतर्फे दाखल केलेले म्हणणे वाचले. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

०२. वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे(थोडक्यात ''सदर संहिता'' असे संबाोधले आहे.) आदेशिका ३९ नियम १, २ अन्वये प्रस्तूत अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे विरूध्द तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणेकरिता दाखल केला आहे. वादीचे कथनानुसार मौजे सोमंथळी, ता.फलटण, जि.सातारा येथील जमिन मिळकत गट नंबर ५५६, क्षेत्र ० –५८ आर मधील संपुर्ण हिस्सा, मौजे नाईकबोमवाडी, ता.फलटण, जि.सातारा येथील जमिन मिळकत गट नंबर ६, क्षेत्र ५ –३५ आर मधील ३ हे. ४७ आर. हिस्सा आणि गट नंबर ३५, क्षेत्र ६ –४४ आर मधील ३ हे. ०४ आर. हिस्सा, मौजे झीरपवाडी, ता.फलटण, जि.सातारा येथील जमिन मिळकत गट नंबर १०७/१, क्षेत्र ३–५८ आर मधील ०–६२.६६ आर हिस्सा, गट नंबर १०७/१/१, क्षेत्र ३–३६ आर मधील ०–०६ आर हिस्सा आणि गट नंबर १०७/१/२, क्षेत्र ०–४८ आर मधील १–१० आर मधील संपुर्ण हिस्सा, मौजे सोनवडी, ता.फलटण, जि.सातारा येथील जमिन मिळकत गट नंबर २२८/अ, क्षेत्र ४–६८ आर मधील ०–३० आर हिस्सा, मौजे जाधववाडी, ता.फलटण, जि.सातारा येथील जमिन मिळकत गट नंबर ६८/३/अ प्लॉट नंबर २३, क्षेत्र २३६–४० चौ.मी. मधील बिनशेती संपुर्ण हिस्सा आणि गट नं.३/ब प्लॉट नं.२२ क्षेत्र १३४–०६ चौ.मी. मधील बिनशेती संपुर्ण हिस्सा, फलटण नगर परिषदेचे हद्दीतील सि.स.नं.३६४०, २९७७, २९७८, २९७९, २९८२, २९८३ या मोकळया जागेतील आठ आणे हिस्सा, लक्ष्मीनगर येथील सि.स.नं.५६०३/८ आणि ५६०४/५ यातील अक्षत प्लाझा या बहुमजली इमारतीतील अ नंबर ६७३ मध्ये सदनिका क्र.१५, प्लॅट ३७.४१ चौ. मि.

निवासी प्लॅट सुविधासह, रविवार पेठ येथील अ नंबर २९१ यात १५.८४ चौ.मी मधील पत्रा शेड, रविवार पेठ येथील अ नंबर २८७, यात १६–८० चौ.मी. मधील पत्रा शेड, मौजे कोळकी ग्रामपंचायत हद्दीतील स.नं.१२१/१अ मालमत्ता क्र.३६५० आरसीसी पध्दतीचे घर ४९५ चौ. फुट स्लॅब बांधकाम संडास बाथरुम सह विजय विहार माणगंगा प्लॅट नं.१४ स.नं.१२१/१ मध्ये तिसरा मजला रहिवास ४९५ चौ.फुट प्लॅट आणि स.नं.१२१/१अ मालमत्ता क्र.११२४ आरसीसी पध्दतीचे घर ५९३ चौ. फुट स्लॅब बांधकाम संडास बाथरुम सह विजय विहार माणगंगा प्लॅट नं.१३ स.नं.१२१/१ अ मध्ये तळमजला रहिवास ५९३ चौ.फुट प्लॅट आणि फलटण येथील रविवार पेठेतील ओंकार ज्वेलर्स या नावाचे ज्वेलर्सचे दुकान सि.स.नं.३६४० क्षेत्रफळ १८.५८ चौ.मी. यातील फर्निचर वैगरे सुविधासहीत अशा सर्व मिळकती सदर दाव्याचा वाद विषय असून यापुढे त्यांना ''दावा मिळकती'' म्हणून संबोधले आहे.

०३. वादीने पुढे असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी हे एकाच कुटूंबातील असून वादीचे वडील कै.आबाजी हिरालाल गायकवाड असून दावा मिळकती एकत्र कुटूंबाचे उत्पन्नातून एकत्र कुटूंबाचे हिताकरिता खरेदी करणेत आलेल्या आहेत. दावा मिळकतींचा वापर व वहिवाट वादी व प्रतिवादी आजही करत आहेत. वादीचे वडील कै.आबाजी हिरालाल गायकवाड यांनी त्यांचे हयातीत प्रतिवादी क्र.१ आणि प्रतिवादी क्र.४ यांचे नांवे काही मिळकती खरेदी केले असले तरी सदर मिळकती त्यांचे एकटयाचे मालकीचे नाहीत. वादी व प्रतिवादी यांचा एकत्र कुटूंबाचा चरितार्थ शेती व्यवसायावर चालत आलेला असून त्यातील भरभराटीतून वादीचे वडीलांचे हयातीत ओंकार ज्वेलर्स हे सराफी दुकान फलटण येथे नावारुपाला आले आहे. वादीचे वडील कै.आबाजी हिरालाल गायकवाड हे दि.१५/०९/२०२० रोजी मयत झाले. वादी व प्रतिवादी यांचे नातेसंबंध असून प्रतिवादी क्र.१ ही वादीची आई, प्रतिवादी क्र.२ व ३ या बहिणी असून प्रतिवादी क्र.४ हा भाऊ

आहे. वादीने तिचे वडीलांचे पश्चात तिचा दावा मिळकतीत असणारा कायदेशीर हिस्स्याचे वाटप करुन मागितले असता प्रतिवादी वाटप करुन देत नाहीत. तसेच गेले १५–२० दिवसापासून प्रतिवादींनी वादीचा हिस्सा डावलून दावा मिळकतीतील काही जमिनीची विक्री करुन विल्हेवाट लावणे आणि दावा मिळकतीवर नव्याने बोजा निर्माण करणेची भाषा करु लागले आहेत. त्यामुळे वादीने दावा मिळकतीतील तिचा १/५ हिस्सा सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेकरिता प्रस्तूतचा दावा दाखल केला असून दरम्यान दावा मिळकतीबाबत प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी कोणतेही प्रकारे हस्तातंरण, तबदील किंवा बोजे निर्माण होतील असे कोणतेही व्यवहार करु नयेत म्हणून त्यांना तुर्तातुर्त ताकीदी देणेत यावी म्हणून प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे.

०४. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वादीचे अर्जास लेखी म्हणणे नि.३६ वर दाखल करून असे कथन आहे की, वादीने खोटा, चुकीचा व लबाडीचा दावा दाखल केला असून वादीचा दावा फेटाळणेस पात्र आहे. वादीने दावा कलम १ मध्ये नमुद केलेल्या सर्व मिळकती या वडीलार्जित नसून सदर सर्व मिळकती कै.आबाजी हिरालाल गायकवाड यांचे स्वकमाईचे असून त्याचे मृत्युपश्चात आजही त्यांचेच नावे आहेत. त्यामुळे मालकी हक्क शाबीत न झाल्यामुळे दाव्यास आवश्यक पक्षकार सामील केले नाही या तत्वाची बाधा येत आहे. वादीचा विवाह सन २००८ रोजी परस्पर कुटूंबाचे संमतीविना झाला असून वादी ही सासरी राहत असल्यामुळे तिचा प्रतिवादींशी कसलाही संबंध नाही. वादीने दावा मिळकतीचे मालकीबाबत तसेच विक्री बाबत केलेली सर्व विधाने खोटी असून ती केवळ न्यायालयाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला आहे. वादीने जे दाव्याचे कारण नमुद केले आहे ते खोटे व चुकीचे आहे कारण अद्याप प्रतिवादींची नांवे दावामिळकती सदरी लागले नाहीत. त्यामुळे देखील वादीचा दावा फेटाळणेस पात्र आहे.

०५. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी ही प्रतिवादी क्र.१ आणि कै.आबाजी हिरालाल गायकवाड यांची मोठी मुलगी आहे. वादीने आईवडीलांचे विरोधात जाऊन शंकर मळाजी अहिवळे यांचेशी विवाह केला आहे. कै.आबाजी हिरालाल गायकवाड यांनी वेगवेगळे व्यवसाय करुन स्थावर मिळकती खरेदी केलेल्या आहेत. शंकर मळाजी अहिवळे याने वादीला फसवून तिचेसोबत विवाह केला आहे. वादी व तिचे पती हे आजही बेरोजगार असून त्यांना उत्पन्नाचे साधन नसून प्रतिवादीने दिलेल्या मदतीवर त्यांचा संसार चालू आहे. वादीचे वडीलांनी वादीला स्वतःचे घराशेजारी जागा घेवून मोठे घर बांधून दिले असून ती आजदेखील तेथेच वास्तव्यास आहे. परंतू वादीने दाव्यामध्ये तिचा राहणेचा पत्ता खोटा व बनावट नमुद केला आहे. वादी व तिचे पती कै.आबाजी हिरालाल गायकवाड हे जिवंत असतानाच पैसे व मालमत्तेची वाटणीची मागणी करत होते. कै.आबाजी हिरालाल गायकवाड यांचे निधन झालेनंतर वादी व तिचे पती यांनी प्रतिवादींकडे पैशाची व मालमत्तेची वाटणी करुन मागू लागले.

०६. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादीने वारस नोंदीसाठी वारस अर्ज क्र.११६/२०२१ हा दाखल केला असून सदर अर्ज सातारा येथील न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. सदर बाब वादीने न्यायालयापासून जाणुनबुझून लपवून ठेवली आहे. प्रतिवादी क्र.१ यांना कै.आबाजी हिरालाल गायकवाड यांनी करुन ठेवलेले मृत्युपत्र हाती लागले असून सदर मृत्युपत्र सप्रमाण सिध्द करणेसाठी प्रतिवादीने सातारा येथील न्यायालयात सप्रमाण अर्ज क्र.१/२०२१ दाखल केलेला असून सदर अर्ज न्यायप्रविष्ट आहे. सदर अर्जात वादी स्वतःहून हजर झाली असून सदर बाब देखील वादीने न्यायालयापासून लपवून ठेवली आहे. सबब सदर मृत्युपत्र सप्रमाण सिध्द होवून वारस नोंदी होत नाही तोपर्यंत कोणत्याही मालमत्तेचे वाटप होवू शकणार नाही. सबब वादीने केवळ प्रतिवादींना त्रास देण्याच्या उद्देशाने प्रस्तूतचा दावा आणि अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे

वादीला सकृतदर्शनी केस नाही. सबब वादीचा दावा आणि प्रस्तूतचा अर्ज खर्चासह फेटाळणेत यावा अशी प्रतिवादी यांनी विनंती केली आहे.

०७. माझे विचारार्थ निघालेले मुद्दे अणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीस प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नाही. |
| २. | न्यायाचा तराजू, वादीचे बाजुने आहे काय ? | नाही. |
| ३. | वादीचे पैशाने भरून न येणारे नुकसान होईल काय ? | नाही. |
| ४. | आदेश | अर्ज नामंजूर करणेत येत आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबत**

०८. वादीने त्यांचे कथनाचे पुष्ठयर्थ मौजे सोमंथळी येथील गट नं.५५६ चा ७/१२ उतारा नि.७ वर, गट नं.५६१ चा ७/१२ उतारा नि.८ वर, मौजे नाईकबोमवाडी येथील गट नं.६ चा ७/१२ उतारा नि.९ वर, गट नं.३५ चा ७/१२ उतारा नि.१० वर, मौजे झिरपवाडी येथील गट नं.१०७/१ चा ७/१२ उतारा नि.११ वर, गट नं.१०७/१/ १ चा ७/१२ उतारा नि.१२ वर, गट नं.१०७/१/ २ चा ७/१२ उतारा नि.१३ वर, मौजे सोनवडी येथील गट नं.२२८/अ चा ७/१२ उतारा नि.१४ वर, मौजे जाधववाडी येथील गट नं.६८/३अ/२३ चा ७/१२ उतारा नि.१५ वर, गट नं.६८/३ब/२२ चा ७/१२ उतारा नि.१६ वर, फलटण येथील सि.स.नं.३६४० चा मालमत्तेचा उतारा नि.१७ वर, सि.स.नं.२९७७ चा मालमत्तेचा उतारा नि.१८ वर, सि.स.नं.२९७८ चा मालमत्तेचा उतारा नि.१९ वर, सि.स.नं.२९७९ चा मालमत्तेचा उतारा नि.२० वर, सि.स.नं.२९८२ चा

मालमत्तेचा उतारा नि.२१ वर, सि.स.नं.२९८३ चा मालमत्तेचा उतारा नि.२२ वर, लक्ष्मीनगर येथील सदनिका क्र.१५ चा उतारा नि.२३ वर, रविवार पेठ, फलटण येथील अ.नं. २९१ चा उतारा नि.२४ वर, रविवार पेठ, फलटण येथील अ.नं.३९९ चा उतारा नि.२५ वर, रविवार पेठ, फलटण येथील अ.नं.२८७ चा उतारा नि.२६ वर, कोळकी येथील प्लॅट नंबर १४ चा उतारा नि.२७ वर आणि प्लॅट नं.१३ चा उतारा नि.२८ वर इ. कागदपत्रे दाखल केली आहेत.

०९. प्रतिवादींनी त्यांचे म्हणणेचे पुष्ठयर्थ जिल्हा न्यायालय, सातारा येथे दाखल केलेल्या प्रोबेट अर्ज क्र.१/२०२१ अर्जाची खरी नक्कल नि.४२/१ वर आणि अर्जात दाखल केलेल्या मृत्युपत्राची खरी नक्कल नि.४२/२ वर दाखल केले आहेत. प्रतिवादींचे विधीज्ञ यांनी त्यांचे कथनाचे पुष्ठयर्थ ***सुनिल गुप्ता वि. किसन गिरहोत्रा आणि इतर दि.०९ ऑक्टोबंर, २००७ मा.सर्वोच्च न्यायालय, इंडीया*** या न्यायनिर्णयांचा आधार घेतला आहे.

१०. वादी आणि प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. दावा मिळकती एकत्र कुटूंबाचे मिळकती आहेत असे वादीचे म्हणणे आहे. प्रतिवादींचा देखील सदर कथनास विरोध नाही. परंतू प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचे वडील आणि प्रतिवादी क्र.१ चे पती म्हणजेच कै.आबाजी हिरालाल गायकवाड यांनी करुन ठेवलेले मृत्युपत्र प्रतिवादी यांना मिळाले असून त्यांनी सदर मृत्युपत्र सप्रमाण सिध्द करणेकामी सप्रमाण अर्ज क्र.१/२०२१ दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये वादी स्वतःहून हजर झाली आहे. त्यामुळे सदरचे मृत्युपत्र सप्रमाण सिध्द होवून वारस नोंदी होत नाहीत तोपर्यत कोणत्याही मालमत्तचे वाटप होऊ शकत नाही. प्रतिवादींनी सदर कथनाचे पुष्ठयर्थ प्रोबेट अर्ज क्र.१/२०२१ अर्जाची खरी नक्कल नि.४२/१ वर आणि सदर अर्जात दाखल केलेल्या मृत्युपत्राची खरी नक्कल नि.४२/२ वर दाखल केले आहेत.

११. वर नमुद कारणास्तव प्रतिवादी हे दावा मिळकतीला वारसांचे नोंदी झाल्याशिवाय हस्तातंर करणेस सक्षम नाही हे दिसून येते. यास्तव प्रतिवादींनी दावा मिळकतीचे हस्तातंर करणेची भाषा केली या कथनात काहीच तथ्य आढळून येत नाही. वादी व प्रतिवादींचे दरम्यान असलेल्या वादाचे स्वरूप विचारात घेता सदर अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे अधिक नुकसान होण्याची शक्यता आहे हे प्रतिवादींनी सकृतदर्शनी दर्शविले आहे. उपलब्ध पुरावा, वादी व प्रतिवादीचे कथने पाहता वादीची तुर्तातुर्त मनाईची मागणी मान्य होणेस पात्र नाही. वादीने त्यांना सकृतदर्शनी केस असल्याचे व न्यायाचा तराजू त्यांचे बाजूने असल्याचे निदर्शनास आणले नाही सबब या बाबी विचारात घेता, मद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर 'नकारार्थी' देत आहे.

**मुद्दा क्र.४ बाबत.**

१२. वर चर्चिले मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्षाचे अनुषंगाने या अर्जाचे खर्चाची बाब अंतिम निर्णयाचेवेळी विचारात घेतली जाईल. सबब मुद्दा क्र.४ चे अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज नि.५ नामंजूर करणेत येत आहे.

२. खर्चाची बाब अंतिम निणर्याचे वेळी निर्णीत केली जाईल.

फलटण
दिनांक : १७.०१.२०२२

**( सौ. उज्वला मि. वैद्य )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फलटण